# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

☎ / फॅक्स २५६५६२३४ Email : jdtepu@pn3.vsnl.net.in. Web.ropune.org.in


**महत्वाचे**

जा.क्र.विकापु/विवि/थेट व्दितीय वर्ष प्रवेश/२००९-१०/ ६५८४ दिनांक :- 4 JUL 2009

प्रति,

प्राचार्य,
शासकीय / शासकीय अनुदानित आणि विनाअनुदानित
पदवी अभियांत्रिकी व औषधनिर्माण शास्त्र संस्था

विषय : शैक्षणिक वर्ष २००९-१० मधील थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी आणि औषधनिर्माण शास्त्र पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियामार्फत करण्याबाबत

संदर्भ : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी वर्तमान पत्रात दिनांक ३०/०६/२००९ रोजी प्रसिध्द केलेली अधिसुचना

उपरोक्त विषयासंदर्भात या कार्यालयाच्या अधिपत्याखाली असणा-या सर्व शासकीय / शासकीय अनुदानित आणि विनाअनुदानित पदवी अभियांत्रिकी व औषधनिर्माण शास्त्र संस्थाना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २००९-१० मधील थेट व्दितीय वर्ष पदवी अभियांत्रिकी आणि औषधनिर्माण शास्त्र अभ्यासक्रमाचे प्रवेश हे मंजूर प्रवेश क्षमतेच्या लॅटरल एन्ट्रीव्दारे भरावयाच्या जांगासह प्रथम वर्षामधून अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या रिक्त जागासुध्दा मल्टिपल राऊंडव्दारे केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियाव्दारे भरण्यात येणार आहेत.

थेट व्दितीय वर्षातील सर्व प्रवेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतून करण्याबाबत शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक जीईसी २००९/(१५/०९) तांशि-४ दि. २५/६/२००९ व जीईसी २००९ (१६/०९) ताशि-४ दि.२५/६/२००९ नुसार आदेश निर्गमित झाले असून त्यातील तरतूदी खालीलप्रमाणे आहेत.

**१) ज्या संस्था दुस-या वर्षाच्या रिक्त जागा संचालक, तंत्रशिक्षण यांना कळविण्यार नाहीत, अशा संस्थाविरूध्द भारतीय दंड विधान संहिता १८६० मधील कलम १८८ नुसार योग्य ती कारवाई करण्यात येईल.**

**२) संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य्, मुंबई यांनी विहीत केलेल्या मुदतीनंतर प्रवेश प्रक्रियेबाबतची माहिती उशिरा अपलोड करणा-या संस्थावर उशिरा अपलोड केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या गुणिले शिक्षण शुल्क गुणिले दोन एवढी रक्कम दंड म्हणून वसूल करण्यात येईल.**

या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या शासकीय/शासकीय अनुदानित आणि विनाअनुदानित अभियांत्रिकी /औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालयांना कळविण्यात येते की, त्यांनी थेट व्दितीय वर्ष पदवी अभ्यासक्रमाच्या केद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी उपलब्ध असलेल्या जागांवर केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया संपेपर्यंत कोणतेही प्रवेश संस्थास्तरावर करू नयेत. तसे केल्यास सदर प्रवेशास मंजूरी देण्यात येणार नाही व अशा संस्थावर वरील प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. थेट व्दितीय वर्षासाठीची केंद्रीभूत प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर जागा शिल्लक राहिल्यास त्या जागा संस्थास्तरावर भरता येतील. सर्व संस्थांनी वरील सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करावे.

गोपंचौधरी

(गो. पं. चौधरी)
प्र. सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,
पुणे

प्रत : श्री शिन्दे एस. बी. प्रोग्रॅमर, यांना कळविण्यात येते की, सदरचे पत्र या कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावे.